*International Journal of Humanities and Social Science Invention (IJHSSI)*
*ISSN (Online): 2319 – 7722, ISSN (Print): 2319 – 7714*
*www.ijhssi.org ||Volume 9 Issue 5 Ser. I || May 2020 || PP 53-61*

# निसर्गातील अद्भुत किमया

Dr. Ashwini Pravin Dehadrai
[1] *Department of Marathi,Bhartiya Vidya Bhavan, Nagpur – 440010.*

***ABSTRACT:*** वृक्षा सारखा दाता नाही. भारतीय संस्कृतीमध्ये वृक्षांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. संत साहित्यात वृक्षाची महती वर्णन केलेली आहे. जाणता राजा शिवछत्रपती यांना वृक्षांची किंमत ज्ञात होती. क्रूरकर्मा औरंगजेबाला वृक्ष प्रेम. पक्षांची घरे. सर्व विषयाचे ज्ञान वृक्षा कडून मिळू शकते. वैद्यक शास्त्र दृष्ट्या आणि वैज्ञानिक दृष्ट्या झाडांची उपयोगिता. धार्मिक अवगुंठन. पूर्व सूचनांचे ज्ञान. वृक्ष तोडताना तारतम्य बाळगण्याची आवश्यकता. वृक्षांचे महत्त्व सर्वमान्य होते. वृक्षांना देवतेचा दर्जा बहाल करण्यासाठी हे लेखन..

***KEYWORDS:*** वृक्षांना अनन्यसाधारण महत्त्व. वृक्षवल्ली आम्हा सोयरे. कर्म करत जा फळाची अपेक्षा करू नका. वनौषधींचा वापर. वृक्ष संवर्धनाची गरज. दुर्मिळ वनस्पतींचा नाश. आयुष्याचा इतिवृत्तांत. कडूलिंब, पिंपळ, बांबू औषधी गुणयुक्त. निसर्गसौंदर्यात वृद्धी. .

---

Date of Submission: 28-04-2020 Date of Acceptance: 11-05-2020

---

## प्रस्तावना

श्री गणेशाय नमः

## निसर्गातील अद्भुत किमया

प्राचीन काळापासून वृक्षांचे जतन केले गेले. पण आज या गोष्टीचा माणसाला विसर पडत आहे. भारतात वृक्षांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. प्राचीन संस्कृतीमध्ये अन्न देणाऱ्या, पोषण करणाऱ्या, सावली देणाऱ्या, वृक्षांना देवतेसमान मानले आहे. तुळस , वड , पिंपळ, औदुंबर या वृक्षांना तर विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यांची पूजाअर्चा करून, प्रार्थना करून किंवा त्यांना देवते समान मानून त्यांची आराधना केली गेलेली आहे. एका अभंगात संत तुकाराम महाराज म्हणतात -

**“जयाचिये द्वारी, तुळशी वृंदावन**
**नाही ते स्मशान, गृह जाणा”**

तुळस ही घरातील भाव भक्तीचे प्रतीक आहे. तुळस पर्यावरण शुद्ध राखणारी एक वनस्पती आहे. ती आरोग्यदायी असल्याने तिचे महात्म्य परंपरेने वाढविले आणि तिचे जतन

केले.औषधी वनस्पती म्हणून तिचे महत्व असल्याने धार्मिक अवगुंठण तिला दिले. वृक्षांप्रति आपला आदर व्यक्त करण्याच्या दृष्टीने त्यांना देवतेचा दर्जा बहाल केलेला दिसतो. हा दर्जा परत मिळवण्यासाठी केलेले लेखन.

संत तुकारामांची अभंगवाणी ही मराठी माणसाच्या जीवनात अविभाज्य अंग झाली आहे . तुकारामांच्या वाणीचा चा वापर आपण दैनंदिन जीवनात अगदी सहजपणे करतो. **'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरी '** असे संत तुकाराम म्हणतात. आमची निसर्गाशी जुळलेली नाळ स्पष्ट करण्यासाठी यापेक्षा अन्वर्थक शब्दरचना कुठली असणार? आपल्या संतांनी आपल्यावर संस्कार करताना जीवनात कोणत्या गोष्टी आवश्यक आहे आणि आपण त्या आचरणात आणाव्यात यावर कायम प्रकाश त्यांनी टाकला आहे. संत तुकारामांची दूरदृष्टी त्यांच्या अभंगातून दिसून येते. जन -जागृतीसाठी रस्त्यावर वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरी अशी वचने वाचायला मिळतात.

**"कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचनम्"** हे गीता वचन आपल्याला कर्म करत राहा फळाची अपेक्षा करू नकोस असा संदेश देते. गीता जे शब्दातून सांगते तेच झाडे आपल्या जीवनातून स्पष्ट करीत असतात. आपल्या वेदांमध्ये ही वृक्षारोपण व वृक्ष पूजनाची विशेष परंपरा सांगितली गेली आहे. प्रयाग क्षेत्राचा अक्षयवट, नाशिकची पंचवटी, अवंतीकेचा सिद्धवट, गयेचा बोधिवृक्ष, वृंदावनाचा वंशीवट, रामायण आणि महाभारतात शमी वृक्षाचे वर्णन आहे. ही वृक्षासंबंधी असलेली श्रद्धेची मूर्तिमंत उदाहरणे होत. वेदांमध्ये व आरण्यकामध्ये वृक्षांचे महत्त्व अधोरेखित केल्याचे आढळते. मत्स्यपुराण, अग्निपुराण, पद्मपुराण, नारदपुराण, रामायण, भगवद्गीता इत्यादी ग्रंथांमधून वृक्षांना लोकांनी देवता मानले गेल्याचे उल्लेख येतात. वैद्यक शास्त्र दृष्ट्या आणि वैज्ञानिक दृष्ट्या कडूनिंबाची उपयोगिता मान्य झालेली आहे . बेल, पिंपळ औदुंबर, तुळस यांना आयुर्वेदात महत्त्वाचे स्थान दिले आहे.

पूर्वी कुणाला खोकला, सर्दी झाले की डॉक्टरकडे न जाता अडुळशाचा काढा, गवती चहाचा काढा, आले- सुंठेचा काढा द्यायचे. पोटात दुखायला लागले की ओव्याचा अर्क द्यायचे . मुका मार लागला असेल तर निर्गुडीच्या पाल्याचा लेप गरम करून त्या भागावर लावायचे. जखम झाली, तर कोळसणीच्या पाल्याचा रस त्यावर टाकायचे . अंगाचा दाह होत असेल तर चंदन उगाळून लावायचे. अशा प्रकारच्या वनौषधी आपल्या अवतीभोवती आहेत पण आपल्याला त्याबद्दल माहिती नसते. वनऔषधी ने शरीरावर वाईट परिणाम होत नाहीत. आयुर्वेदात या वनौषधींची नावे ही त्यांच्या नावावरून ठेवलेली आढळतात. जसे दाडिमावलेह, अशोकारिष्ट, चंदनासव, द्राक्षासव, अर्जुनारिष्ट, इत्यादी. आपल्या ऋषी-मुनींनी प्रत्येक देवते बरोबर एका वृक्षाची योजना करून ठेवली. महादेवाचे मंदिर म्हटले, की तिथे बेल आणि

पांढऱ्या फुलांची झाडे आवश्यक ठरविली. दत्तगुरु बरोबर औदुंबर आला. विष्णू साठी तुळशीची योजना झाली. या प्रत्येक देवाला वाहण्यासाठी फुले - पत्री गणपतीसाठी दुर्वा ठरवून दिल्यामुळे सहजपणे ती आवश्यक बनली.

आज फार मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होऊ लागलेली आहे. वनसंपदा संपुष्टात येते की काय ? अशी भीती वाटू लागली आहे. अशा काळात वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन व संगोपनाचे कार्यक्रम मोठ्या प्रमाणात राबविण्याची गरज निर्माण झाली आहे. देवराया, गायराने, जंगले विकासाच्या नावाखाली भक्ष्यस्थानी पडत आहेत. अनेक दुर्मिळ वनस्पती, वृक्ष नष्ट होत आहेत. किंबहुना होण्याच्या मार्गावर आहेत. पैशाच्या मागे धावणाऱ्या जगात पुन्हा वृक्षांचा आदर सन्मान संगोपनाची संस्कृती निर्माण करून आपल्या पृथ्वीला हरित भरीत ठेवणे, हे केवळ आपल्याच हातात आहे . ही आपली सगळ्यांची जबाबदारी समजून कार्य केले पाहिजे. जंगलं रात्रीतून निर्माण होत नाही. जंगलं कशी निर्माण झाली असावीत? याचे उत्तर वनमहर्षि मारूती चितमपल्ली मोठ्या मार्मिक पद्धतीने देतात, **"जंगल कशी निर्माण झाली असावीत? वाऱ्यावादळानं वृक्षाचं बीज जिकडं - तिकडं विखुरलं , पाण्यानं ते वाहून आलं. तर कुठं पाखरांनी आणून टाकलं. जमिनीच्या पोता प्रमाणं कुठे ते वाया गेलं, तर कुठं रुजलं, वाढलं. जनावरांपासून वाचलं तेवढं फोफावलं . त्यांची झाडं झाली. कुठं एकटं - दुकट , कुठं समूहानं."** (1) अशी जंगलं महत्प्रयासाने निर्माण होतात. अशा जंगलाचा सांभाळ करणे आपले आद्य कर्तव्य आहे.

वृक्ष अंकुरण्यासाठी वर्षानुवर्षे लागतात. म्हणून वृक्ष तोडताना तारतम्य बाळगण्याची आवश्यकता आहे. वृक्ष स्वतःच्या गुणवैशिष्ट्यांचा दिंडोरा पिटत नाहीत, तर यांच्या अस्तित्वातून त्यांचे मोठेपण समाजाला मान्य करावे लागते. स्वतः जवळ असलेल्या गोष्टींचा मोठेपणा संत सज्जनांच्या जवळ नसतो. त्यामुळे त्यांचे वैभव क्वचित प्रसंगी कुणाच्या लक्षात येते. कुणाच्या लक्षात एखादी गोष्ट आली नाही म्हणून त्यांचा मोठेपणा कमी होत नाही, तो दिवसांगणित वाढत जातो.

**" गुरुजनांकडून शिकता येणार नाही ते वृक्ष व दगडांनी पढविलंय. वृक्षा इतका धर्मात्मा कोणी नाही." (2)** असे वृक्षाबद्दलचे मारुती चितमपल्ली यांनी काढलेले उद्‌गार आहेत.

' वृक्षतोड थांबवा 'हा काही आजचा नारा नाही. प्राचीन काळात वृक्षांचे महत्व ओळखून त्यांचे संवर्धन केल्या जात होते.' आज्ञापत्र' यात जाणता राजा शिवछत्रपती यांची राजनीति वर्णन करताना आरमाराला लागणारे साहित्य सांगताना पुढील उतारा आला आहे.

**"आरमारास तक्ते , सोंट , डोलाच्या काठ्या , आदि करून थोर लाकडे असावी लागतात. आपले राज्यात अरण्यात सागवानादि वृक्ष आहेत त्यांचे जे अनुकूल पडेल ते हुजूरचे परवानगीने तोडून न्यावे. या विरहित जे लागेल ते स्वराज्यातील आंबे, फणस आदिवरून हेही लाकडे आरमाराच्या प्रयोजनाची, परंतु त्यास हात लावू देऊ नये. काय म्हणोन ही झाडे वर्षा दोन वर्षांनी होतात असे नाही. रयतांनी ही झाडे लावून लेकरांसारखी बहुत काळ जतन करून वाढवली. ती झाडे तोडल्यावर त्यांचे दुःखास पारावार काय ? एकास दुःख देऊन जे कार्य करीत म्हटले ते कार्य करणारासहित स्वल्पकाळाचें बुडोन नाहींसेच होते. किंबहुना धनियाचे पदरी प्रजा संतोषेयाचा दोष पडतो. या वृक्षांच्या अभावें हानिही होते. याकरिता हे गोष्टी सर्वथैव होऊ न द्यावी. कदाचित एखादें जे झाड बहुत जीर्ण होऊन कामातून गेले असेल तरी त्याचे धन्यास राजी करून घेऊन द्रव्य देऊन त्यांचे संतोष तोडून न्यावे. बलात्कार सर्वथैव न करावा." (3)** राजा कसा दक्ष असावा याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणून छत्रपती शिवाजी महाराज डोळ्यांसमोर उभे राहतात. विकासाच्या एकूण गरजा लक्षात घेता, पर्यावरणातील वनस्पती' यावर नेहमीच ताण पडणार आहे. यातून आपल्याला शिवरायांची दूरदृष्टी दिसून येते.

वृक्षांचे महत्त्व सर्वांनाच मान्य होते. क्रूरकर्मा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या औरंगजेब बादशहाला ही वृक्ष संगोपनाचे महत्त्व होते. हे विवेक घळसासी यांनी सांगितलेल्या कथेतून स्पष्ट होते. ती कथा अशी -

**"बादशहा औरंगजेबाचा दरबार भरला होता. तसा तो नित्याचा दरबार होता. पण एक खास दूत आल्याने तो दरबार विशेष ठरला होता. त्या दूताने बादशहाला कुर्निसात केला आणि नम्रपणे उभा राहिला. बादशहाने त्याच्या येण्याचे कारण विचारता दूत म्हणाला, "जहापन्हा मी श्रीनगर हून आलो आहे." थोडे थांबून दूत म्हणाला, " एक खबर आपल्यापर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी माझ्यावर सोपविण्यात आली आहे. शहराबाहेर अचानक वनवा पेटल्याने खास बागेतील झाडे जळून गेली आणि बागेतल्या मशिदे चे ही नुकसान झाले."**

**बादशहाला धक्का बसला. तो म्हणाला, "मशिदी भोवतीच समोरच्या बाजूला**

**असणाऱ्या चीनाराच्या वृक्षांना आग लागली? चीनारही जळून गेले?" त्यावर दूत म्हणाला, " अल्लाची कृपा! वारा उलट्या दिशेने वाहत होता. त्यामुळे चिनार वृक्ष वाचले ." बादशहाने सुस्कारा टाकला. जणू काही झालेच नाही. हे पाहून मौलवीने विचारले, "आपण चिनारची चौकशी केली. पण मशिदीचे काय? " बादशहाने मशिदीच्या संदर्भात काहीच विचारना न केल्याने मौलवी चकीत झाले नसते तर नवलच! बादशहा शांतपणे म्हणाले,**
**"मौला जी मशिदीची डागडुजी करता येईल. मनात आलेच तर अल्पकाळात दुसरी देखणी मशीदही ही बांधून घेता येईल. पण चिनार वृक्ष पूर्ण वाढायला खूप वर्षे लागतील!" ( 4)** तात्पर्य - ईश्वराचे अस्तित्व सजीव वनस्पतीत पाहिले की मग वस्तूचा तोरा फार उरत नाही.

संतांनी वृक्षा संबंधी आदर व्यक्त करताना त्यांना देवत्व बहाल केले आहे. गीता जे शब्दातून सांगते ते झाड आपल्या जीवनातून स्पष्ट करतात. अशोक हे सौंदर्याचे तर आम्र हे मांगल्याचे प्रतीक आहे. वटवृक्ष जसाजसा विशाल होतो तसा-तसा तो वैभवशाली दिसतो. म्हणूनच प्राचीन काळी वटवृक्षाला' कल्पवृक्ष' असेही म्हणत. आपण झाडां कडून बऱ्याच गोष्टी शिकण्यासारख्या आहेत.

सागवानाच्या झाडातून त्याच्या आयुष्याचा इतिवृत्तांत आपल्याला समजू शकतो . त्या झाडाच्या खोडाला आडवे कापले तर या गाभ्यापासून सुरू होणारी पार वर्तुळ दिसतात. कधी अवर्षण पडलं कधी मुबलक पाऊस पडला हे सार त्यावर रेखाटलेलं असतं. त्यात दिसणार्याण वर्तुळावरून त्याचा इतिवृत्तांत समजतो. जीवन हे आवर्तनासारखे आहे असे म्हणतात, त्याची मला आठवण झाली. त्याहीपलीकडे "हे ब्रहम पूर्ण आहे. त्याचप्रमाणे जग पूर्ण आहे. शून्यातून शून्य वजा केले तर शून्यच राहते. सर्वत्र शांती असो." असा संदेश देणाऱ्या 'ईशावाल्यापनिषादा' तील

**ओम पूर्णमदः पूर्णमिदं**
**पूर्णात्पूर्णमुदच्यते**
**पूर्णस्य पूर्ण मादाय**
**पूर्णामेवावशिष्य ते**
**ओम शांतिः शांतिःशांतिः** ( 5)

या शांती मंत्राची आठवण होते. जीवनाची वर्तुळाकार गती सुचविणारी ही वर्तुळे

म्हणजे मौलिक जीवन भाष्यच होय. शिवाय जीवनात येणाऱ्या चढ-उताराच्या वेळी माणसांना जणू दिलासा देण्यासाठी सागवान उल्लेखनीय वाटतो.

**कडूनिंब, कडूनिंबाची ओळख आपल्याला बालगीतांमधून झालेली आहे.**

**“चांदोबा चांदोबा भागलास का?**

**निंबोणीच्या झाडामागे लपलास का? ”**

**हे** गीत असो किंवा

**“निंबोणीच्या झाडामागे चंद्र झोपला ग! बाई**

**आज माझ्या पाडसाला झोप का ग येत नाही?”**

आजही हे झाड या गीतातून जिवंत आहे. कडुनिंबाच्या झाडावर कावळ्यांची दरवर्षी नवीन घरटी दिसतात. कावळ्यांना आश्रय देणाऱ्या वृक्षांना ऋग्वेदात काकाम्बीर म्हंटलआहे. वैशाख महिन्यात या वृक्षावर कावळ्यांची घरटी करणे पुढे सुकाळ असल्याचं लक्षण आहे. चंद्रप्रकाशात या झाडाच्या सौंदर्यात भर पडते. औषधी गुणयुक्त झाड म्हणून या झाडाकडे पहिले जाते. आजही ग्रामीण भागात नागपंचमी सारख्या सणांना आलेल्या माहेरवाशिन मुलींसाठी या झाडाच्या फांद्यांना झोका बांधून शृंगार गीत गाण्याची पद्धत आहे . शुद्ध हवेसाठी कदाचित याच झाडावर झोके बांधत असावे. मजबूत आणि लवचिक हे झाड असते. कडुलिंबाची पाने सदा हिरवीगार असतात. कडू लिंबाला पांढरा नाजूक सुंदर फुलोरा येतो. हा फुलोरा वर्षातून दोनदा येतो. चैत्र प्रतिपदेला कडुलिंबाची पान, फुलोरा, कैरी आणि चण्याची डाळ घालून चटणी वाटतात. तसेच कडुलिंबाची पान फुलं आणि गूळ याचा नैवेद्य गुढीला दाखवतात. तो प्रसाद म्हणून प्राशन करतात. हे त्याच्या औषधी गुणधर्मामुळे येत असेल. लिंबोणीच्या बियांपासून तेल काढतात. त्याचा उपयोग जंतुनाशक द्रव्य औषधी बनविण्याकरिता होतो. धान्याला कीड लागू नये म्हणून कडुलिंबाचा पाला धान्य टाकतात.

पाच ते सहा मीटर पर्यंत झाडावर चढत जाणारी पानगळी व बारिक फांद्याची वेल साऱ्या भारतभर आढळते. ही वेल कुसुमगुंजा ची असते. गुंजा चे दोन प्रकार आहेत. एक पांढरी आणि दुसरी तांबडी. जसा मधमाशांच्या पोळ्यातील मेणाच्या छिद्राचा आकार अचूक षटकोणी असतो, तसाच प्रत्येक गुंज एक सारखा आकाराचा व वजनाचा असतो. यातून निसर्गाच्या गणिताची किमया दिसून येते. यावरून असे वाटते निसर्गातून माणूस सगळेच विषय शिकू शकतो.९६ गुंजा म्हणजे एक तोळा हे निसर्गाच्या गणितातील किमया नाहीतर दुसरे काय? निसर्ग माणसाचा सर्वांगीण विकास करू शकतो. ही शक्यता नाकारता येणार नाही. मारुती चितमपल्ली यांचे गुंजा या वेलीने लक्ष वेधले ते भूकंपाच्या पूर्व सूचनांचे ज्ञान

या वेलीला होते, असे समजले तेव्हा. गुंजा ची पाने लाजाळूच्या पानांसारखी मिटतात. त्यावेळेस भूकंप, ज्वालामुखी आणि हवामानातील प्रचंड उत्पात याची पूर्वसूचना देत असल्याचे वनस्पती शास्त्रज्ञांना आढळून आले. ही निसर्गाची लीला समजून घेतली, तर आपणाला पुष्कळ पूर्वसूचना मिळतील. पुष्कळ वाईट गोष्टी निसर्ग अभ्यासाने आपण टाळू शकू.

माणसांच्या सोबती पेक्षा मारुती चितमपल्ली हे वृक्षांच्या सानिध्यात अधिक काळ वावरले. वृक्षांच्या सहवासातच त्यांच्या आयुष्याचा अधिक काळ गेला. झाडांच्या सावलीत फिरताना एकटेपणाची जाणीव कधी झालीच नाही. ते म्हणतात,

**“झाडाइतकं सुख, आनंद आणि समाधान अपवाद वगळल्यास मला दुसरं कोणी देऊ शकलं नाही.”** (6) इतक झाडाच मोठेपण त्यांच्या लेखी आहे. मग ही मोठी झाड आपल्या दृष्टीसही आपण ठेवली पाहिजे. सतत देत राहणे हा वृक्षाचा स्वभाव आपण जर स्वीकारला तर आपल्यासारखा दुसरा दाता नाही.

बालकवींची,

**“ऐल तटावर पैल तटावर हिरवाळी घेऊन**
**निळासावळा झरा वाहतो बेटाबेटांतुन**
**चार घरांचे गाव चिमुकले पैल टेकडीकडे;**
**शेतमळ्यांची दाट लागली हिरवी गरदी पुढे**
**पायवाट पांढरी तयातुनि अडवी तिडवी पडे**
**हिरव्या कुरणांमधून चालली काळया डोहाकडे**
**झाकळुनी जळ गोड काळिमा पसरी लाटांवर**
**पाय टाकुनी जळांत बसला असला औदुंबर"(7)**

कविता वाचली म्हणजे झाडांनी कवींना भुरळ घातल्याचे दिसते. निसर्गाशी तादात्म्य पावणे बालकवींना जमले.

बांबू हा देखील काव्य विषय झाला आहे. बांबू वजनाने हलका, पोकळ व मजबूत तसेच लवचिक अशा गुणधर्मामुळे बांबू बहुउद्देशीय झाला आहे. रेडिओचा प्रसाराच्या सुरुवातीच्या काळात एरियलची गरज होती म्हणून घराच्या उंच भागी दोन टोकांना बांबू उभारून त्यावर तार किंवा जाळी वापरीत. हे दृश्य पाहून,

**वन बांबूचे पिवळ्या गाते**
**आकाशातील आधोरेखिते (8)**

अशा ओळी मर्ढेकरांना सुचल्या. खेड्यात घराच्या बांधकामासाठी बांबू वापरतात. हिवाळ्यात बांबूची पाने घोड्यांना चारली तर ती शक्तिवर्धक असतात. तसेच हत्तींना पिंपळाची पाने आवडतात. पिंपळाची हवा निरोगी असते म्हणून हत्तीचे आरोग्य चांगले राहण्यासाठी त्याला पिंपळाचा चारा देतात.

भारतीय माणूस स्वतःभोवती गुरफटलेला आहे. त्याला मी आणि माझे यापुढे काही सुचत नाही . पण जपानी संस्कृतीने वृक्षांचे महत्त्व जपलेले दिसते. चेरिवर त्यांनी हायकू लिहिल्या आहेत. आपला पळसही फुलल्यावर सुंदर दिसतो. लक्ष वेधले जाते. पण आपण त्याकडे सोईस्कर रित्या दुर्लक्ष करतो.

पूर्वी गाव परत्वे वड व पिंपळाचे पार असायचे. याचा मुख्य उद्देश शेतीचे रक्षण करणे हा असावा. वड , पिंपळ जेव्हा बहरतात तेव्हा पाखरांना व माकडांना भरपूर खाद्य मिळते. म्हणून ती शेतापर्यंत नुकसान करण्यास पोहोचत नाही. तसेच चिंचेचे झाड गावाच्या वेशीवर असायचे. त्यामुळे गाव आले हे लक्षात यायचे. पण आता वृक्षतोड झाल्यामुळे चिंचेचे झाड गावाच्या वेशीवर दिसत नाही. ही सारी झाडे पशुपक्ष्यांची झाडे आहेत. वृक्षांना सौंदर्य बहाल करणारी सारंगगारे कित्येक वेळा वडाच्या झाडावर असतात. ही झाडे जसजशी विशाल होतात तसतशी ती वैभवशाली दिसतात.

गदिमां ही झाडांच्या मोहात पडले, म्हणूनच की काय,

**“ हे चिंचेचे झाड दिसे मज चिनार वृक्षापरी**
**दिसशी तू नवतरुणी काश्मिरी”**

त्यांचे हे मराठीतील लोकप्रिय गीत आज आपल्या पर्यंत आले आहे. अशा या अनेक वृक्षांचे सौंदर्य नवीन पिढीला अनुभवता आले नाही. त्यांना गाण्यावर समाधान मानावे लागते ही शोकांतिका आहे.

झाड वाढत्या वयाबरोबर निसर्गाचे सौंदर्य वाढवतो. पण माणूस मात्र वाढत्या वयाबरोबर कुरूप दिसू लागतो. ही वास्तविकता लक्षात घेऊन आपण वृक्ष संपत्तीचे महत्त्व जाणले पाहिजे. **“वृक्षा सारखं नित्यनवीन असं सृष्टीत काही नसावं.”** (9) या चितमपल्ली यांच्या विचाराने आपण अंतर्मुख होऊन जातो. नवीनतेतील सौंदर्य जपण्यासाठी हात पुढे करू या. निसर्गातील अद्भुत किमयांचा लाभ घेऊ या. निसर्गातील महत्त्वाचा घटक म्हणून वृक्षांकडे बघूया. वृक्ष आहे तर श्वास आहे. आणि श्वास आहे तर आपण आहोत. हे गणित एकदा समजावून घेतले पाहिजे.

## संदर्भग्रंथ

1. जंगलाचं देणं - - -  मारुती चितमपल्ली

2. तत्रैव

3. आज्ञापत्र - - - संपादक विलास खोले

4. लोकसत्ता - - -' वृक्षवल्ली आम्हा'- विवेक घळसासी 13 मार्च 2002

5. उपनिषदांचे मराठी भाषांतर- - - सिद्धेश्वरशास्त्री चित्रा

6. रानवाटा - - - मारुती चितमपल्ली

7. फुलराणी  बालकवींची निवडक कविता- - - संपादक कुसुमाग्रज

8. मर्ढेकरांची कविता - - - बा. सी . मर्ढेकर

9. रानवाटा - - - मारुती चितमपल्ली